प्रभात

# कुमार रिॲल्टीकडून 'मॅग्नासिटी'च्या दुसऱ्या फेजचे अनावरण

## रिअल इस्टेट क्षेत्रात तब्बल ६० वर्षांची यशस्वी वाटचाल



**पुणे, दि. २० -** पुण्यातील आघाडीच्या रिअल इस्टेट विकासकांपैकी एक असलेल्या कुमार रिॲल्टीने व्यवसायातील ६० वर्षे पूर्ण करत पुणे-सोलापूर महामार्गावरील मांजरी येथे विकसित होत असलेल्या १४० एकरांच्या अत्याधुनिक 'मॅग्नासिटी' टाउनशिपमधील दुसऱ्या फेजचे अनावरण केले. कुमार रिॲल्टीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मनीष जैन यांनी ही घोषणा केली. जैन कुटुंबातील चौथ्या पिढीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या मैथिली जैन यांचीही यावेळी उपस्थिती होती.

'मॅग्नासिटी'ला ईयॉन आय टी पार्क, एस. पी. इंफोसिटी आणि सायबरसिटी यांसारख्या प्रमुख आयटी हब्सशी उत्तम कनेक्टिव्हिटी लाभते. तसेच प्रस्तावित पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळ, रिंग रोड, मल्टी-मेट्रो कनेक्टिव्हिटी आणि आगामी बुलेट ट्रेन कॉरिडॉर यामुळे या परिसराच्या भविष्यातील विकासाला मोठी चालना मिळणार आहे.

मॅग्नासिटीत २ आणि ३ बीएचके सदनिकांचे पर्याय सुमारे ७३ लाख ते १ कोटी रुपयांच्या किंमत श्रेणीत असतील. कुमार रिॲल्टीच्या रिअल इस्टेट क्षेत्रातील ६० वर्षांच्या पूर्ततेनिमित्त घर खरेदीदारांसाठी ३ लाख रुपयांपर्यंतचा विशेष किंमत लाभही देण्यात येत आहे. १४० एकरांवर विस्तारलेल्या या टाउनशिपमध्ये २२ ते २५ टक्के क्षेत्र मोकळ्या जागांसाठी राखण्यात येणार आहे. १ लाख चौरस फुटांचा भव्य क्लब विकसित केला जाणार असून, त्यामध्ये स्वीमिंग पूल, बँक्वेट हॉल, रेस्टॉरंट, गेस्ट रूम, जिम आणि मिनी थिएटर अशा सुविधा असतील.

मनीष जैन म्हणाले, आयटी समुदायाच्या सीईओ, एमडी तसेच वित्त क्षेत्रातील व्यावसायिक आणि सॉफ्टवेअर इंजिनिअर्स गरजा यांच्या लक्षात घेऊन हाय-मिड-इन्कम आणि लक्झरी श्रेणीतील निवासी प्रकल्पांवर आमचा भर राहणार आहे. कुमार रियल्टीची स्थापना १९६६ मध्ये केसरीमल आणि विमलकुमार जैन यांनी केली. आजवर कंपनीने आतापर्यंत ४२,००० कुटुंबांना त्यांनी घरे उपलब्ध करून दिली आहेत.